**निवडणूक / तातडीचे**

ठाणे महानगरपालिका, ठाणे
निवडणूक विभाग,
क्र. ठामपा/निवि/अति.आयुक्त- ३६६
दिनांक : ११.०३.२०१९

## -: आदेश :-

प्रति,
**उपआयुक्त सर्व / उप-आयुक्त परिमंडळ - १, २, ३.**
**वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका,**
**परिवहन व्यवस्थापक, परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका,**
**शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका,**
**सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका**
**सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**विषय :-** **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन - २०१९. आदर्श आचारसंहितेबाबत तात्काळ व प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे कार्यालयाकडील पत्र सामान्य/कक्ष-१/मेज-४/निवडणूक/कावि-१३६, दिनांक ११.०३.२०१९.
२. मा. भारत निर्वाचन आयोग, नवी दिल्ली, यांचेकडील प्रेसनोट क्र. ECI/PN/२३/२०१९, दिनांक १०.०३.२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. भारत निर्वाचन आयोग यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०१९ बाबतचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत कार्यक्रमानुसार सोमवार दिनांक २९.०४.२०१९ रोजी मतदान होणार असून मतमोजणी गुरुवार दिनांक २३.०५.२०१९ रोजी होणार आहे.

दिनांक १०.०३.२०१९ रोजी पासून प्रस्तुत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झालेली असून सदरची आचारसंहिता निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत म्हणजेच दिनांक २३.०५.२०१९ पर्यंत लागू राहणार आहे.

मा. भारत निर्वाचन आयोगाने सदर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०१९ करिता आदर्श आचारसंहिता पुस्तिका मार्च २०१९ [ MANUAL ON MODEL CODE OF CONDUCT – MARCH – 2019 ] प्रसिद्ध केली आहे. सदरची पुस्तिका https://ceo.maharashtra.gov.in/# या संकेत स्थळावर हॅण्डबुक व मॅन्युअल या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. सदर आचारसंहिता पुस्तिका सदरच्या संकेत स्थळावरुन आपण आपले स्तरावर उपलब्ध (डाउनलोड) करुन घ्यावी.

आपल्या विभागाशी संबंधित बाबींवर कार्यवाही करताना कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्धवल्यास भारत निर्वाचन आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. उदाहरणादाखल खालीलप्रमाणे काही मुद्दयांबाबत कार्यवाही करणेबाबत आदेश करण्यात येत आहेत. सदर मुद्दे उदाहरणादाखल असून सर्वसमावेशक मुद्दयांसाठी आयोगाचे आदेश विचारात घ्यावे.

१) आदर्श आचारसंहिता कालवधीत शासकीय / निमशासकीय, महामंडळे इत्यादींची जागा, इमारती, मालमत्ता, वाहने, इत्यादींचा प्रचारासाठी वापर / दुरुपयोग करता येणार नाही.

२) ठाणे महापालिका पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेली वाहने / वाहनांची सवलत तातडीने आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रतिबंधीत करावी.

३) ठाणे महापालिका पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेले मोबाईल सेवा, सीम कार्ड, टॅब वगैरे तत्सम वस्तु आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रतिबंधीत कराव्यात.

४) महापालिका सचिव, ठाणे महानगरपालिका, यांनी महापालिका पदाधिकारी, नगरसेवक / नगरसेविका यांचेशी संबंधित बाबींबाबत आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

५) उप आयुक्त, सुरक्षा विभाग / सुरक्षा विभाग प्रमुख यांनी महापालिका पदाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या सुरक्षा रक्षकांबाबत आयोगाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

६) नगर अभियंता / उपनगर अभियंता / कार्यकारी अभियंता यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयात लावलेल्या मा. पंतप्रधान, मा. मुख्यमंत्री व अन्य राजकीय पक्षांशी संबंधित नेत्यांचे / व्यक्तींचे फोटोबाबत मा. आयोगाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी.

७) सर्व विभाग प्रमुखांनी मतदारांवर प्रभाव पडेल, ज्यामध्ये राजकीय पक्षांचा समावेश असेल अशा स्वरुपाची मतदारांशी निगडीत महापालिकेच्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये. तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे इत्यादी मधील अधिकारी / कर्मचारी यांना राजकीय पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करण्यावर निर्बंध असून सदर बाब आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी / संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

८) मतदारांवर प्रभाव पडेल अशा स्वरुपाचा कोणताही धोरणात्मक निर्णय, नविन विकास कामांच्या प्रस्तावावर निणर्य, कोणत्याही स्तरावरील शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे इत्यादी मधील प्राधिकारी यांनी आचारसंहितेच्या कालावधीत निर्गमित करु नये.

९) सर्व सहाय्यक आयुक्त / उप नगर अभियंता / कार्यकारी अभियंता, सर्व प्रभाग समिती यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये पदाधिकाऱ्यांचे, राजकीय पक्षांचे अनधिकृतपणे लावलेले पोस्टर्स, बॅनर्स, झेंडे, बोर्ड तात्काळ काढून घ्यावेत. आचारसंहितेच्या कालावधीत नियमबाह्यपणे राजकीय पक्षांचे, पदाधिकाऱ्यांचे पोस्टर्स बॅनर्स, झेंडे आपल्या कार्यक्षेत्रामध्यें लावले जाणार नाहीत याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

१०) आचारसंहिता कालावधीत महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामांच्या यापूर्वी लावलेल्या सर्व प्रकारच्या कोनशिलांवर पदाधिकाऱ्यांची नावे असल्यास ते झाकून टाकण्याची ( Masking ) नगर अभियंता / उप नगर अभियंता / कार्यकारी अभियंता, सर्व प्रभाग समिती यांनी दक्षता घ्यावी.

११) आचारसंहिता कालावधीत कोणत्याही शंका उद्भवल्यास तसेच संदिग्धता असल्यास प्रथम कळजीपुर्वक आयोगाचे मॅन्युअलमधील तरतुदींचे वाचन करावे. तदनंतरही शंकेचे निराकरण झाले नाही तर अशा प्रकरणी परस्पर गृहीतकांवर आधारीत निर्णय घेऊ नये. तथापी याबाबत पुढील मार्गदर्शनासाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे मार्फत आयोगाकडे मार्गदर्शन मागविणेची कार्यवाही करावी.

सदर कालावधीत आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे अवलंबन केले जाईल व कोणत्याही परिस्थितीत आणि कोणत्याही स्तरावर आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याबाबत संबंधितांनी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

**<u>मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने</u>**

( राजेंद्र अहिवर )
**अतिरिक्त आयुक्त (१)**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**प्रत :-**
स्वीय सहाय्यक, मा. महापौर, ठाणे मनपा,
स्वीय सहाय्यक, मा. उप-महापौर, ठाणे मनपा,
स्वीय सहाय्यक, मा. सभागृह नेता, ठाणे मनपा,
स्वीय सहाय्यक, मा. विरोधी पक्ष नेता, ठाणे मनपा,
स्वीय सहाय्यक, मा. अध्यक्ष, सर्व प्रभाग समिती कार्यालये, ठाणे मनपा,
मा. गट नेता, यांचे कार्यालय (सर्व राजकीय पक्ष), ठाणे मनपा,
**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कार्यवाहीसाठी.**